IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Impact Factor: 7.301

Volume 3, Issue 3, January 2023

# ब्रिटिश कालखंडातील रायगड जिल्ह्यातील शिक्षण विकास

**प्रा. डॉ. प्रभाकर गणपत गावंड**

सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर, रायगड

pggawand@gmail.com

**गोषवारा**

भारतात ब्रिटिशांचे आगमन होईपर्यंत भारतीय शिक्षणाचे स्वरुप हे प्रामुख्याने पारंपारिक व धार्मिक स्वरुपाचे होते. भारतातील बहुसंख्य हिंदू धर्मीयांचे शिक्षण हे पारंपारिक पाठशाळांमधून होत असे तर मुस्लिम धर्मीयांसाठी मदरशांमधून शिक्षण दिले जाई. हिंदू धर्मात ब्राम्हणांची शिक्षणावर मक्तेदारी होती. प्रामुख्याने संस्कृत भाषेमधून शिक्षण दिले जाई. मुस्लिम मदरशांतील शिक्षण हे अरबी भाषेत दिले जाई. संस्कृत आणि अरबी या भाषा सामान्य लोकांमध्ये बोलल्या जात नव्हत्या. या काळातील शिक्षण हे पारंपारिक पध्दतीचे होते. ब्रिटिश भारतात आल्यानंतर भारतीय षिक्षण पध्दतीचे वास्तव त्यांच्या लक्षात आले. विल्यम कॅरी या ख्रिश्चन मिषनऱ्याने बंगाल व मद्रास प्रांतात प्रथम इंग्रजी शाळा स्थापन केली.' आणि खऱ्या अर्थाने इंग्रजी शिक्षणाचा पाया भारतात घातला गेला.

ब्रिटिश सत्ता भारतात स्थिरावल्यानंतर त्यांनी भारतात अनेक प्रकारच्या सुधारणा घडवून आणण्यास प्रारंभ केला. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार हा त्यांचाच एक भाग होता. मुळात ब्रिटिशांनी भारतात शिक्षणाचा सुरु केलेला प्रसार हा भारतीय लोकांना सज्ञान करणे, शहाणे करणे, त्यांच्यातील मागासलेपणा दूर करणे यासाठी अजिबात नव्हता. भारतीय लोकांविषयी ब्रिटिशांना सहानुभूती वाटत होती म्हणूनही नव्हता. तर ब्रिटिशांचे साम्राज्य भारतात अधिक बळकट व्हावे, ते भक्कम पायावर उभे रहावे यासाठी ब्रिटिशांना हवा असलेला नोकरदारांचा, कामगारांचा पुरवठा करण्यासाठी शिक्षण ही त्यांना गरजेची बाब होती. म्हणून भारतात ठिकठिकाणी इंग्रजी शाळा सुरू करण्याचे, किंबहुना शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम ब्रिटिशांनी केले.

ब्रिटिशांनीपाश्चात्य शिक्षणावर भर दिला. मात्र इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या भारतीय तरुणांना जेव्हा इंग्लंड मधील लोकषाही शासनप्रणालीचा परिचय झाला तेव्हापासून इंग्रजांच्या भारतीय साम्राज्यवादाविषयी त्यांच्या मनामध्ये तिरस्कार निर्माण होण्यास प्रारंभ झाला.

1839 ला कुलाबा संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलिन झाल्यानंतर ठिकठिकाणी शिक्षणाचा प्रसार होण्यास प्रारंभ झाला. 1840 मध्ये महाड येथे पहिली देशी शाळा सुरू झाली. ख्रिश्चन मिशनरी, खाजगी शिक्षणसंस्था अथवा सरकार यांनी केलेल्या शिक्षणाच्या प्रसारातून आधुनिक शिक्षणाची कवाडे सामान्यांना खुली झाली.

Key Word –शिक्षण, शाळा, इंग्रज

**प्रस्तावना –**

रायगड जिल्ह्याला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. शिवकाळापासून ते ब्रिटिशांचे वर्चस्व प्रस्थापित होईपर्यंत रायगड जिल्ह्यात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वा आध्यात्मिक घडामोडी घडून आल्या होत्या. भारतात ब्रिटिशांचे आगमन होईपर्यंत भारतीय शिक्षणाचे स्वरुप हे प्रामुख्याने पारंपारिक व धार्मिक स्वरुपाचे होते.[1] भारतातील बहुसंख्य हिंदू धर्मीयांचे शिक्षण हे पारंपारिक पाठशाळांमधून होत असे तर मुस्लिम धर्मीयांसाठी मदरशांमधून शिक्षण दिले जाई. हिंदू धर्मात ब्राम्हणांची शिक्षणावर मक्तेदारी होती. प्रामुख्याने संस्कृत भाषेमधून शिक्षण दिले जाई. मुस्लिम मदरशांतील शिक्षण हे अरबी भाषेत दिले जाई. संस्कृत आणि अरबी या भाषा सामान्य लोकांमध्ये बोलल्या जात नव्हत्या.

या काळातील शिक्षण हे पारंपारिक पध्दतीचे होते. विद्यार्थ्यांस मोडी लिपी, बालबोध लेखन वाचन, आकडेमोड करणे, या गोष्टी पंतोजी किंवा एकशिक्षकी शाळेत शिकविल्या जात. देऊळ किंवा चावडी अशा ठिकाणी या शाळा भरत असत.[2]मराठा काळात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. 1839 मध्ये आंग्रे घराण्याचा पाडाव करून ब्रिटिशांनी जिल्ह्यावर आपले प्रभुत्व संपादन केले. मात्र जिल्ह्यातील मुरुड, म्हसळा व श्रीवर्धन हे ती तालुके जंजिरा संस्थानात समाविष्ट होते. पाली–सुधागड हा तालुका भोर संस्थानात होता, तर पनवेल, उरण व कर्जत हे तालुके तत्कालिन ठाणे जिल्ह्यात समाविष्ट होते.1848 ते 1856 या काळात लॉर्ड डलहौसी हा भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून कार्यरत होता. त्याच्या कारकीर्दीत संस्थाने खालसा करण्याचे धोरण अधिक प्रभावीपणे राबविण्यात आले. कुलाबा संस्थानाचे ब्रिटिश साम्राज्यातील विलीनीकरण हे देखील त्याच्याच धोरणानुसार 1853 मध्ये अधिक परिणामकारक रित्या करण्यात आले. कुलाबा संस्थानाच्या बाहेरील राजपुरी (मुरूड), साक्षी (पेण), व रायगड (महाड) हे उपविभाग व काही लहान लहान महाल यांचा समावेश करून कुलाबा हा उपजिल्हा बनविण्यात आला. त्यानंतरच्या 15 ते 20 वर्षाच्या काळात

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/ IJARSCT-8118

ब्रिटिशांनीअनेक प्रशासकीय बदल केले आणि 1869 मध्ये कुलाबा हा स्वतंत्र जिल्हा निर्माण केला. यावेळी कुलाबा या नवीन जिल्ह्यात अलिबाग, रोहा, पेण, माणगाव व महाड हे तालुके समाविष्ट होते. पुढे 1883 मध्ये ठाणे जिल्ह्यातील उरण व पनवेल हे तालुके तर 1891 मध्ये कर्जत हा तालुका रायगड जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला.[3]

रायगड जिल्हा ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली येण्यापूर्वीजिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार हा अत्यल्प होता. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू व ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा फक्त मोठ्याा गावांमध्ये होत्या.या शाळांमध्ये बारा वर्षाखालील मुलांना शिक्षण दिले जाई. या शाळांमधील शिक्षक प्रामुख्याने ब्राम्हण असत. गावच्या प्रमुखांकडून त्यांना पगार दिला जाई. गणित विषय सोडला तर या शिक्षकांकडे अध्यापन कलेत विशेष कौशल्य नसे. इतर कलांचे ज्ञान हे कुलपरंपरेने मिळत असे. सरकार कडून विद्यार्थ्यांना देणगी किंवा सरकारी नोकरीच्या रूपाने उत्तेजन मिळत असे.

मराठा कालखंडात नागाव व पेण ही विद्येची केंद्रे होती. तेथेऋग्वेदी व यजुर्वेदी शास्त्रांच्या वेधशाळा व संस्कृत पाठशाळा होत्या. त्यात विनामूल्य शिक्षण घेऊन संस्कृत पंडित तयार होत असत. आंग्रे राजवटीत अलिबागच्या कुलाबा किल्ल्यामध्ये विद्यार्थी भोजनालय होते.[4] त्याचा खर्च आंग्रे सरकार कडून केला जात असे. ब्रिटिश भारतात आल्यानंतर भारतीय शिक्षण पध्दतीचे वास्तव त्यांच्या लक्षात आले. विल्यम कॅरी या खिश्चन मिशनऱ्याने बंगाल व मद्रास प्रांतात प्रथम इंग्रजी शाळा स्थापन केली.' आणि खऱ्या अर्थाने इंग्रजी शिक्षणाचा पाया भारतात घातला गेला.[5]

ब्रिटिशांनी जिल्ह्याची शिक्षण व्यवस्था ताब्यात घेतल्यानंतर अशा खाजगी शाळांवर प्रतिकूल परिणाम झाला. जिल्ह्यातील शहरे व मोठी गावे वगळता बहुतेक शाळा शाळा बंद पडू लागल्या. ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर (1839) जिल्ह्यात पहिली सरकारी देशी (व्हर्नाक्युलर) शाळा 1840 मध्ये महाड येथे व दुसरी शाळा 1856 मध्ये नागोठणे येथे उघडली.[6]त्यावेळी नागोठणे हे भोर संस्थानात समाविष्ट होते. त्यानंतर अलिबाग तालुक्यात 3 महाड व माणगाव तालुक्यात प्रत्येकी 2 व पेण आणि रोहा तालुक्यात प्रत्येकी 1 अशा शाळा स्थापन झाल्या.

कालांतराने शैक्षणिक सुविधा वाढत गेल्या. तत्कालीन कुलाबा जिल्ह्यामध्ये 1865–66 मध्ये चार ॲंग्लो व्हर्नाक्युलर शाळा व तीस देशी शाळा अस्तित्वात होत्या. सन 1879–80मध्ये जिल्ह्यात 66 देशी शाळा व 1 मुलींची शाळा होती. या वर्षी एकूण शाळांची संख्या 73 पर्यंत होती तर 1881–82 मध्ये त्यांची संख्या 82 झाली. यापैकी 77 शाळा या सरकारी होत्या. या शाळांमध्ये मराठी माध्यमातून शिकविले जाई.

जिल्ह्यात मुलींसाठी पहिली शाळा 1861 मध्ये अलिबाग येथे सुरू झाली.[7]रायगड जिल्ह्यातील पाली–सुधागड हा तालुका भोर संस्थानात समाविष्ट असल्याने या तालुक्याची शिक्षण व्यवस्था संस्थानिकाच्या ताब्यात होती.त्यामुळे संस्थानाद्वारे पाली, नाडसूर, आतोने, जांभूळपाडा व सिद्धेश्वर येथे शाळा उघडल्या.कर्जत शहरात सुद्धा एक शाळा अस्तित्वात होती. तत्कालीन कुलाबा जिल्ह्यात समाविष्ट नसलेल्या पनवेल येथेही पहिली सरकारी शाळा 1850 च्या सुमारास सुरू झाली. सन 1879–80 मध्ये पनवेल शहरात तीन सरकारी शाळा अस्तित्वात होत्या. त्यात दुसऱ्या श्रेणीची ॲंग्लो व्हर्नाक्युलर शाळा, उर्दू शाळा व मुलींची शाळा होती.

इंग्रजांनी सार्वजनिक स्वरुपाच्या शाळा सुरू कराव्यात व या शाळांमधून सर्व विषयांचे शिक्षण दिले जावे अशी प्रथा सुरू केली. या प्रथेनुसार पनवेल शहरात 1848 मध्ये मराठी शाळेची स्थापना झाली,[8] तर 1872 मध्ये गुलाम साहेब राऊत यांनी आपल्या राहत्या घरात उर्दू शाळा सुरू केली होती. सन 1881–82 मध्ये एक पर्शियन शाळा व दलितांसाठी एक शाळा अस्तित्वात होती. सन 1885 पासून या शाळा नगर पालिकेच्या ताब्यात आल्याचे नमूद केले.

उरणमध्ये 1854 मध्ये उरण शाळा नंबर 1, 1871 मध्ये कन्याशाळा नंबर 2,1892 मध्ये नेटिव इन्स्टिट्यूट उरण इंग्रजी शाळा व 1904 मध्ये अनुदानित उर्दू शाळा स्थापन झाली. फ्री मिशन चर्चने अलिबाग येथे 1879 मध्ये पहिली इंग्रजी शाळा सुरु केली. 1882 पर्यंत या शाळेव्यतिरिक्त तत्कालीन कुलाबा जिल्ह्यातील दुसरी एकही इंग्रजी शाळा अस्तित्वात नव्हती.

इंग्रजी शिक्षणासाठी श्रीमंत लोक आपल्या मुलांना मुंबई किंवा पुण्यात पाठवीत असत 1865–66 मध्ये अलिबाग, रोहा, महाड येथे खाजगी शाळांमधून इंग्रजी शिकवले जाई. परंतु अतिरिक्त शुल्कवाढव अन्य कारणांमुळे अलिबागची शाळा 1876 मध्ये, रोहा येथील शाळा 1867 मध्ये, महाड येथील शाळा 1871 मध्ये व पेण येथील शाळा 1872 मध्ये बंद पडली. 1879–80 मध्ये अलिबाग, पेण, महाड व रोहा शहरात प्रत्येकी दोन सरकारी शाळा होत्या.

महाड येथे जून 1882 मध्ये मुलांची शाळा सुरू झाली. पनवेलमध्ये 1879 मध्ये तीन शाळा अस्तित्वात होत्या. कुलाबा जिल्ह्यातील चार शहरे वगळता ग्रामीण भागात 1879–80मध्ये सरासरी अठरा खेड्यांना एक शाळा असे प्रमाण होते. अलिबाग विभागात 160 खेड्यांमधून 15 शाळा, महाड उपविभागात 244 खेड्यांमधून 11 शाळा, माणगाव उपविभागात 224 खेड्यांमधून 17 शाळा, पेण उपविभागातील 195 खेड्यांमधून 8 शाळा, रोहा उपविभागातील 129 खेड्यांमधून मुलांच्या आठ शाळा होत्या. याच वर्षी पनवेल उपविभागात 217 गावांमध्ये 18 शाळा तर कर्जत उपविभागात 270 गावांमध्ये 17 शाळा अस्तित्वात होत्या.

जंजिरा संस्थानातील मुरुड येथे 1870 मध्ये पहिली सरकारी शाळा सुरू झाली.[9] 1871 मध्ये तिला माध्यमिक शाळेचा दर्जा मिळाला. सन 1873 मध्ये श्रीवर्धन येथे दुसरी शाळा उघडली.त्याच वर्षी मुरुड, म्हसळा व श्रीवर्धन येथे प्रत्येकी एक देशी

शाळा होती. त्यानंतर 1875–76 मध्ये बोर्लिपंचतन येथे दोन व हरिहरेश्वर आणि बोर्ली–मांडला येथे प्रत्येकी एक शाळा सुरू झाली. सन 1876 मध्ये जंजिरा संस्थानातील शाळांची संख्या 14 होती. 1881–82 मध्ये ही संख्या 22 झाली. यामध्ये 1221 विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्याशिवाय 46 खाजगी शाळांमध्ये 354 विद्यार्थी होते. संस्थानामध्ये दलित मुलांसाठी शाळेची विशेष सोय नव्हती.1874 मध्ये जंजिरा संस्थानाच्या नावाने शिक्षण समितीची स्थापना केली.[10] या समितीचे अध्यक्ष हे इंग्रज सरकारने नेमलेले असिस्टंट पोलिटिकल एजंट होते. व सभासदांमध्ये 5 मुसलमान व 3 हिंदूंचा समावेश होता.

प्रत्येक उपविभागात मुख्य महसूल अधिकाऱ्यांच्या अधिकाराखाली दोन हिंदू व दोन मुसलमान सभासद असलेल्या उपसमित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. 1855 मध्ये मुंबई इलाख्यासाठी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनची नियुक्ती झाल्यावर शिक्षणास सुसंघटित स्वरूप देण्यास प्रारंभ झाला. सन 1881–82 मध्ये जिल्ह्यातील शाळांना मार्गदर्शन व त्यावर निरीक्षण करण्यासाठी तत्कालीन सेंट्रल डिव्हिजनमध्ये शिक्षण कार्यासाठी 158 कर्मचारी होते. त्याशिवाय पनवेल व कर्जत भागांसाठी वेगळा कर्मचारी वर्ग होता.

याच काळात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी जिल्ह्यात शिक्षण संस्थांचे जाळे पसरवण्यास सुरुवात केली. फ्री मिशन चर्चने अलिबागमध्ये 1879 मध्ये इंग्रजी शाळा सुरू केली. त्यांच्या कार्यास शह देण्यासाठी वासुदेव गणेशरानडे, केशव रावजी आठवले, सीताराम विनायक घाटे व गणेश दामोदर टिल्लू या चौघा ध्येयवेड्या तरुणांनी गरीब विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी 1 जानेवारी 1917 रोजी कुलाबा स्टुडंट्स नामक संस्था स्थापन केली.[11] 1918 मध्ये तिचे 'कोकण एज्युकेशन सोसायटी' मध्ये रूपांतर झाले. संस्थेची स्थापना अलिबागला झाली तरी तिचे सुरुवातीचे कार्यक्षेत्र अलिबागच्या बाहेर होते.

सन 1917 मध्ये रोहा नगरपालिकेची इंग्रजी शाळा कोकण एज्युकेशन सोसायटीने ताब्यात घेतली. जिल्ह्यातील शिक्षण प्रसाराचे कार्य या संस्थेने पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या धर्तीवर मोठ्या जोमाने सुरू केले. वरील शिक्षण संस्थेव्यतिरिक्त पेण एज्युकेशन सोसायटी (1910), अभिनव ज्ञान मंदिर कर्जत (1935), अलिबाग शिक्षण प्रसारक मंडळ (1937), माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटी(1945) या शिक्षण संस्था जिल्ह्यात स्थापन झाल्या.

कर्जत तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने त्या तालुक्यात चालविलेल्या व्हॉलेन्टरी शाळा हा एक वेगळा प्रयोग होता. विठ्ठल लक्ष्मण उर्फ कोतवाल व राजाराम बाळकृष्ण तथा भाऊसाहेब राऊत यांनी काढलेल्या शाळांमध्ये राष्ट्रीय शिक्षण दिले जाई. इतर शाळांपेक्षा येथील शिक्षण पद्धती वेगळ्या स्वरूपाची होती. भाई कोतवाल यांच्या हयातीत त्यांच्या 42 शाळा कार्यरत होत्या. सन 1941 मध्ये स्थापन झालेल्या पालीच्या सुधागड एज्युकेशन सोसायटीने भोर संस्थानातील डोंगरी, तसेच आदिवासी भागांमध्ये बरेच शैक्षणिक कार्य केले. पालीचे ग.बा. वडेर हायस्कूल म्हणजे एक नमुनेदार विद्यालय मानण्यात येते. पालीचे केशव गोविंद लिमये हे या संस्थेच्या अध्यक्षपदावर असताना आदिवासी लोकांच्या शिक्षणासाठी त्यांनी बरेच काम केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तींमध्ये प्रामुख्याने चिमणराव कुलकर्णी, गो. चि. कुलकर्णी, विनायकराव उकिडवे, केशव सीताराम ठाकरे, दादासाहेब आरेकर, दि. वि. पुरोहित, गणेश भास्कर साने, गोविंद्र रामचंद्र लिमये, हरी बळवंत जोशी, हरिभाऊ गणेश लागू, ल. के. भावे, भिकाजी कृष्ण पटवर्धन, बाळकृष्ण करंदीकर, त्रंबक अ. कुलकर्णी, ज. वि. लेले,वा. ग. रानडे, के. रा. आठवले, सी. वि. घाटे, गुलाम साहेब राऊत, विठ्ठल लक्ष्मण कोतवाल, राजाराम बाळकृष्ण राऊत, दत्ताजीराव खानविलकर, जमशेटजी नौरोजी पालीवाला, रामजी सेठ मेहता, प्राणशंकर ज. पंड्या, वसंत पंढरीनाथ समेळ इ. चा समावेश होता.

1923 च्या प्राथमिक शिक्षण अधिनियमानुसार ग्रामीण भागात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले. या कायद्यानुसार डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डाची स्थापना होऊन शिक्षणविषयक कारभार बोर्डाकडे सोपवण्यात आला.1926–27 जिल्ह्यात एकूण 17 सभासदांचे स्कूल बोर्ड प्रथम मध्ये अस्तित्वात आले. 1942 पर्यंत बोर्डाचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे होते. त्यानंतर ते पेण येथे हलविण्यात आले. गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट 1935 नुसार प्रांतिक स्वायत्तता येऊन पहिले लोकनियुक्त काँग्रेस मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. त्यानंतर 1937 मध्ये ग्रामीण भागातील शिक्षण विकासावर भर देण्यात आला. त्यानूसार 1923 च्या कायद्यातील दोष दूर करण्यासाठी 1939 मध्ये नवीन कायदा करण्यात आला. हा कायदा पुढे रद्द करून 1947मध्ये प्राथमिक शिक्षणासाठी नवीन कायदा बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन 1947 संमत करण्यात आला.

## संदर्भ

[1]. कठारे (डॉ.) अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, 2009, पृ. 101
[2]. राऊत गणेश व इतर, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (1818–1960), डसयमंड पब्लिकेशन्स पुणे, 2009, पृ. 113
[3]. चौधरी कि. का., (संपा.) रायगड जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, 1993, पृ. 582
[4]. ढबू दा. गो., कुलाबकर आंग्रे सरखेल:आंग्रे घराण्याचा इतिहास, शंकर नारायण जोशी, अलिबाग, 1939, पृ. 342
[5]. कदम य. ना., पूर्वोक्त, पृ. 204
[6]. चौधरी कि. का., (संपा.) पूर्वोक्त, पृ. 609

[7]. कुलाबा गॅझेटिअर, 1883, पृ. 230

[8]. सुवर्णक्षण, पनवेल नगरपरिषद शतकोत्तर महोत्सव ग्रंथ, 1852—2002, पृ. 63

[9]. चौधरी कि. का., (संपा.) पूर्वोक्त, पृ. 609

[10]. जाधव (डॉ.) बबन भिवसेन, रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळःशेतकऱ्यांचा सहभाग, लक्ष्मी बुक पब्लिकेशन्स, सोलापूर,2014, पृ. 72

[11]. कशाळकर हर्षद, कोकण एज्युकेशन सोसायटीची शताब्दी, दै. लोकसत्ता, 20 डिसेंबर 2017